# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना

दूरध्वनी क्रमांक २५६०११५३
२५६९७३४१
२५६०११६०
२५६०११५४

फॅक्स क्रमांक २५६०११५४,

गणेशखिंड, पुणे ४११००७


संदर्भ क्र.:विविमं/२०१८–१९/३९३ **स्मरणपत्र** दि. १२/०९/२०१८

प्रति,
मा. प्राचार्य / मा. संचालक / मा. विभागप्रमुख
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व
महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभाग.

विषय :केरळमधील अतिवर्षण व पूरग्रस्तांसाठीच्या मदतनिधीसाठी मा. कुलगुरू निधी तात्काळ जमा करणेबाबत.

महोदय/महोदया,

अतिवर्षण व पूरग्रस्त परिस्थितीमुळे केरळमधील व कर्नाटकातील काही भागात जनजीवन अत्यंत विस्कळीत व उद्ध्वस्त झाले आहे. नैसर्गिक व मानवी मालमत्तेची अपरिमित हानी झाली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितिन करमळकर यांच्या निर्देशानुसार राष्ट्रीय सेवा योजना विभाग व विद्यार्थी विकास मंडळ विभाग केरळमधील पूरग्रस्तांसाठी विविध प्रकारची मदत व पनुर्वसनासाठी विद्यापीठपातळीवर केंद्रवर्तीयंत्रणा उभी करत आहे. पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हयातून RTGS, Net Banking धनादेश याद्वारे समाजातील सर्व थरांतून निधी जमा करून मा. कुलगुरू निधीची निर्मिती करणे आणि तो निधी पूरग्रस्त केरळवासियांपर्यंत पोहोचवणे याबाबत विद्यापीठामार्फत यापूर्वी या विभागाच्या संदर्भ क्रमांक विविमं/२०१८–१९/३५६, दि. २९/०८/२०१८ अन्वये आवाहन करण्यात आले आहे.

**विद्यार्थी, पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच आपल्या आजूबाजूच्या परिसरातील नागरिक, व्यावसायिक, नोकरदार ह्यांना केरळमधील पूरग्रस्तांच्या मदतीसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने उपलब्ध करून दिलेल्या ऑनलाईन यंत्रणेद्वारा (याकरिता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (१. मुख्य पानावर २. News and Announcements या सदरात ३. विद्यार्थी विकास मंडळाच्या मुख्य पानावर ४. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या मुख्य पानावर) Kerala Flood relief Vice-chancellor Fund. या नावाने लिंकद्वारे किंवा मा. वित्त व लेखाधिकारी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (**Finance & Accounts Officer Savitribai Phule Pune University) **यांच्या नावे धनाकर्ष/धनादेश स्वरूपात विद्यार्थी विकास मंडळ/राष्ट्रीय सेवा योजना कार्यालयात तात्काळ जमा करावा, असे निर्देशित करण्यात येत आहे.**

संचालक,(अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ/राष्ट्रीय सेवा योजना